## ग्रामपंचायत निवडणूक : "मविआपेक्षा दुप्पट जागा भाजपाला", फडणवीसांचा टोला



| वर्ष - 7 । अंक - 180 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- बांगलादेशचा रोमहर्षक विजय!
- रिचानं नेटकऱ्यांचे टोचले कान
- इंडिया आघाडीत बिघाडी?
- भुजबळांमागे मास्टरमाइंड कोण

www.mahaenews.com । मंगळवार, दिनांक 7 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



# तळेगाव-चाकण प्रवास जीवघेणा!

## »अपघाताचे प्रमाण वाढले : वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खड्ड्यांमुळे चाळण झालेला आणि नित्याच्या वाहतूक कोंडीत अडकलेला तळेगाव-चाकण रस्ता मोकळा श्वास कधी घेणार?, अशी विचारणा प्रवासी आणि स्थानिक नागरिक करीत आहेत. त्यातच वाढत्या अपघातामुळे हा रस्ता मृत्युचा सापळा बनत चालला आहे. पिंपरी चिंचवड, भोसरी, चाकण आणि तळेगाव एमआयडीसीस जोडणाऱ्या तळेगाव – चाकण – शिक्रापूर या राष्ट्रीय महामार्गावर होत असलेल्या अवजड वाहनांच्या धोकादायक रहदारीच्या मार्गामुळे अपघात वाढले आहेत.**

दरम्यान शनिवारी (दि. ४) रोजी सायंकाळी ७.०० च्या सुमारास चाकण तळेगाव मार्गावरील सुदुंबरे-सुदवडी येथील सुधा नदी पुलाजवळ कंन्टेनर आणि दुचाकीचा अपघात झाला. त्यात किवळेतील ३३ वर्षीय दुचाकीस्वाराला स्वतःचा जीव गमवावा लागला आहे. तसेच दुसऱ्या दिवशी रविवारी (दि. ५) रोजी सुदुंबरे-सुदवडी हद्दीतच चाकण तळेगाव मार्गावर कार आणि ट्रकचा अपघात झाला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. त्यातच मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहनांची रस्त्यावर रीघ लागली होती.

या धोकादायक रस्त्याने हजारो चाकरमानी आपला जीव मुठीत घेऊन दररोज प्रवास करीत आहेत. शिवाय येथील ब्रिटीशकालीन सुधा नदीवरील दगडी पूल आणि महाळुंगे येथील दगडी पुल धोकादायक अवस्थेत आहेत. त्याचेही स्ट्रकचरल ऑडीट व्हायला हवे, अशी जुनी



मागणीदेखील प्रवाशांची आहे. या नित्याच्या वाहतूक कोंडीतून दिलासा देण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्वरित अस्तित्वातील रस्त्याचे सर्वेक्षण करून रहदारीस अडथळा ठरणारी अतिक्रमणे हटवून रस्ता रुंदीकरण करावे. एमआयडीसी कामगार आणि वाहनधारकांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिकांसह पिंपरी, चिंचवड आणि मावळ तालुक्यातील नागरिक करीत आहेत.

> "तळेगाव-चाकण महामार्गासाठी पर्यायी बाह्यवळण होणं गरजेच आहे. त्यामुळे मोठी वाहनं त्यामार्गे जातील. केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे समक्ष भेटून रस्त्याबाबत मागणी केली होती. त्यांनी सहा महिन्यात रस्त्यासाठी टेंडर काढण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. त्यावर अद्याप कुठलीही कार्यवाही झालेली नाही. याच रस्त्यासाठी शेतकरी स्वतः जागा द्यायला तयार आहे. २०१७ साली आम्ही एमआयडीसीला रस्त्यासाठी आमच्या जागा द्यायला तयार झालो होतो. मात्र अद्यापही शासन जागे होतं नाही. त्यामुळे चाकण-तळेगाव महामार्गाचे भिजत घोंगडे अडले आहे.
>
> **– मा. रामदास काकडे**, (स्थानिक शेतकरी).



# ग्रामीण भागावर अजित दादांचे वर्चस्व!

## » बारामती तालुक्यातील दोन ग्रामपंचायती भाजपकडे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्ह्यातील २३१ ग्रामपंचायतींच्या झालेल्या निवडणुकांमध्ये सर्वाधिक ग्रामपंचायती ताब्यात घेत उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व पुन्हा सिद्ध झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर प्रथमच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अजित पवार यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे.**



अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी १५८ ग्रामपंचायती जिंकल्याचा दावा केला. दरम्यान, भाजपकडे १९, काँग्रेस ११, शरद पवार गट पाच, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेकडे प्रत्येकी चार ग्रामपंचायती आल्याचा कल असून अपक्षांनी २९ ग्रामपंचायतींवर वर्चस्व मिळविले आहे. बारामती तालुक्यातील ३२ ग्रामपंचायतींपैकी ३० ग्रामपंचायतींवर अजित पवार गटाने वर्चस्व मिळविले आहे दोन ग्रामपंचायती भाजपने जिंकल्या आहेत. आंबेगावात ३० पैकी २५ ग्रामपंचायतींवर अजित पवार गटाचे, तर दोनमध्ये शिवसेना आणि तीन ग्रामपंचायतींवर अपक्षांनी सत्ता मिळविली आहे भोरमध्ये २७ पैकी नऊ ग्रामपंचायतींवर अजित पवार गट, तर आठ ग्रामपंचायतींवर काँग्रेसने झेंडा फडकवला असून नऊ जागांवर अपक्ष, तर एक जागा रिक्त राहिली आहे जुन्नर तालुक्यातील २६ पैकी २० ग्रामपंचायती अजित पवार गटाने ताब्यात घेतल्या आहेत, तर दोन ग्रामपंचायतींवर भाजप आणि चार ग्रामपंचायतींवर अपक्षांनी विजय मिळविला आहे खेड तालुक्यात २५ पैकी २४ ग्रामपंचायतींवर अजित पवार गट, तर एका जागेवर भाजपने विजय मिळविला. मुळशी तालुक्यात २३ पैकी १२ ठिकाणी अजित पवार गट, तर शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांना प्रत्येकी चार ग्रामपंचायतींवर विजय मिळविला आहे, तर तीन ग्रामपंचायतींवर अपक्षांनी वर्चस्व मिळविले मावळात १९ पैकी १३ ग्रामपंचायतींवर अजित पवार गट, तर सहा ग्रामपंचायतींवर भाजपने वर्चस्व मिळविले आहे पुरंदर तालुक्यात १५ पैकी पाच ठिकाणी अजित पवार गट, तीन ठिकाणी काँग्रेस, दोन शिवसेना, तर पाच ग्रामपंचायतींवर अपक्षांनी वर्चस्व मिळविले दौंड तालुक्यात ११ पैकी सहा ठिकाणी अजित पवार गट, चार ठिकाणी भाजप, तर एका ठिकाणी अपक्ष, शिरूरमध्ये आठपैकी तीन ठिकाणी अजित पवार गट, दोन भाजप, एका ठिकाणी शरद पवार गट, तर दोन अपक्षांकडे आल्या आहेत. इंदापूरात सहा ग्रामपंचायतीपैकी पाच ठिकाणी अजित पवार गट, एका ठिकाणी भाजप, वेल्हा तालुक्यात सहापैकी चार ग्रामपंचायतींवर अजित पवार गट, तर एक ठिकाणी भाजप आणि एका ठिकाणी अपक्षांनी विजय मिळविला आहे हवेलीत तीनपैकी दोन ठिकाणी अजित पवार गट, तर एका ठिकाणी अपक्षांनी विजय मिळविला. ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये संपूर्ण जिल्ह्याचे बारामती तालुक्याकडे लागून राहिले होते. याठिकाणी सर्वाधिक ३२ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत तब्बल ३० ठिकाणी अजित पवार यांचे वर्चस्व राहिले आहे मात्र, दोन ग्रामपंचायतीवर भाजपने विजय मिळवत बारामती तालुक्यात चंचुप्रवेश केला आहे. खेड आणि आंबेगाव तालुक्यात दिलीप मोहिते-पाटील आणि दिलीप वळसे- पाटील यांनी ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे मावळमध्ये सुनील शेळके, इंदापूरमध्ये माजी राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, दौंडमध्ये रमेश थोरात यांचे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत वर्चस्व राहिले आहे.

### हवेलीने महायुतीला नाकारले

» राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार हे शिंदे फडणवीस यांच्या सरकारमध्ये जाऊन उपमुख्यमंत्रीपदी विराजमान होऊन चार महिन्यांचा कालावधी होऊन गेला त्यानंतर काल राज्यातील अनेक भागांत ग्रामपंचायत निवडणुका झाल्या. त्यामध्ये शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांची महायुती आणि शरद पवार गट, उद्धव ठाकरे गट, काँग्रेस महाविकास आघाडी या दोन्हींपैकी कोणत्या विचाराच्या ग्रामपंचायतीच्या पॅनलला मतदान केले जाते याकडे सर्वांचे होते. हवेली तालुक्यात शरद पवार यांच्या पॅनलला पसंती मिळाल्याचे दिसून आले. जिल्ह्यातील मुदत संपणाऱ्या २३१ पैकी १८६ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक, तर १४२ पैकी ३१ ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक पार पडली. पुणे जिल्ह्यात रविवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ८०.५२ टक्के इतके, तर पोटनिवडणुकीत ७९.६८ टक्के इतके मतदान झाले. आज हवेली तालुक्यातील कोलावडे साष्टे, खामगाव मावळ येथील मतमोजणी मामलेदार कचेरी येथे पार पडली.

# राज्यभरातील वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्याला धोका!

## » राज्य सरकारकडून खबरदारीच्या उपाययोजनांना सुरुवात

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यभरात अनेक शहरांमध्ये प्रदूषणाची पातळी वाढली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) दोनशेपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे राज्याच्या आरोग्य विभागाने आता पावले उचलली आहेत. हवा प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहोचू नये, यासाठी उपाययोजना करण्यास सुरुवात करण्यात आली आहे.**



हिवाळ्यामुळे वातावरणातील प्रदूषित वायू आणि धुलिकण हे हवेतच राहिल्याने हवेची गुणवत्ता खराब होते. त्यामुळे मानवी आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतात.

या महिन्यात राज्यात विविध शहरांची हवेची गुणवत्ता खराब झालेली असून, हवा गुणवत्ता निर्देशांक दोनशेच्या पुढे गेल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सर्व जिल्हे आणि महापालिकांच्या प्रशासनाला आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जनजागृती करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, अशी माहिती आरोग्य सेवा विभागाचे सहसंचालक डॉ. प्रतापसिंह सारणीकर यांनी दिली.

राज्यातील १७ शहरांमध्ये वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या तीव्र आजारांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. प्रत्येक शहरातील रुग्णालयांच्या आपत्कालीन विभागामध्ये तीव्र श्वसनासंबंधी आजारांचे सर्वेक्षण करण्यात येईल. शहरांसाठी नोंदविलेली दैनंदिन एक्यूआय पातळी आणि श्वसनाच्या आजारांचे रुग्ण यांची माहिती संकलित केली जाईल. वायुप्रदूषणाशी संबंधित आजार आणि रुग्णांच्या मृत्यूची आकडेवारी नोंदविली जाणार आहे. एक्यूआय पातळी आणि हॉट स्पॉट ओळखून तिथे आवश्यक आरोग्य सेवा पुरवण्यात येतील, असे सारणीकर यांनी स्पष्ट केले.

### तीव्र आजारांचे करण्यात येणार सर्वेक्षण

» राज्यातील १७ शहरांमध्ये वायुप्रदूषणामुळे होणाऱ्या तीव्र आजारांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. प्रत्येक शहरातील रुग्णालयांच्या आपत्कालीन विभागामध्ये तीव्र श्वसनासंबंधी आजारांचे सर्वेक्षण करण्यात येईल. शहरांसाठी नोंदविलेली दैनंदिन एक्यूआय पातळी आणि श्वसनाच्या आजारांचे रुग्ण यांची माहिती संकलित केली जाईल. वायुप्रदूषणाशी संबंधित आजार आणि रुग्णांच्या मृत्यूची आकडेवारी नोंदविली जाणार आहे. एक्यूआय पातळी आणि हॉट स्पॉट ओळखून तिथे आवश्यक आरोग्य सेवा पुरवण्यात येतील, असे सारणीकर यांनी स्पष्ट केले.

# इच्छुकांनो होशियार!

## आगामी महापालिका निवडणुका सहा महिन्यांवर! : स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी भाजपाची मोठी रणनिती



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्ह्यातील २३१ ग्रामपंचायतींच्या झालेल्या निवडणुकांमध्ये सर्वाधिक ग्रामपंचायती ताब्यात घेत उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे वर्चस्व पुन्हा सिद्ध झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर प्रथमच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अजित पवार यांनी आपली ताकद दाखवून दिली आहे.**



पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू होऊन आता दीड वर्ष झाले. महापालिका सार्वत्रिक निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत, असे चित्र हेतुपूर्वक निर्माण केले जात असून, विरोधी पक्षातील इच्छुकांना गाफील ठेवण्यात येत आहे. सत्ताधारी भाजपाने लोकसभा निवडणुकीनंतर तात्काळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची 'रणनिती' आखली आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांना 'होशियार' रहावे लागणार आहे.

महापालिका निवडणूक २०२४ की २०२५ मध्ये होणार... अशी साशंकता निर्माण झाली आहे. मात्र, भारतीय जनता पार्टीकडून राज्यात बूथनिहाय, मंडलनिहाय नियोजन सुरू आहे. लोकसभा प्रवास योजनेंतर्गत राज्यातील ४८ लोकसभा मतदार संघातून भाजपा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहे. विशेष म्हणजे, लोकसभा निवडणुकीत भाजपाला पूर्ण बहुमत मिळेल आणि त्यांचा प्रभाव स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये होईल. त्याचा फायदा आगामी विधानसभा निवडणुकीत होईल, असा सर्व्हे आहे.

भाजपा आणि अन्य त्रयस्थ संस्थांच्या वतीने आतापर्यंत तीन सर्व्हे केले आहेत. त्यानुसार पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये लोकसभेच्या पुणे, शिरुर आणि मावळ अशा तीनही जागा महायुतीला मिळतील, असा दावा केला आहे. बारामतीच्या जागेकरिता 'महायुती'ने ताकद पणाला लावली आहे. तसेच, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी "मे- २०२४ मध्ये नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदावर बहुमताने विराजमान होतील." असा दावा केला आहे. केंद्रातील भाजपाचे वरिष्ठ नेते ज्यापद्धतीने प्रचार कार्यात सक्रीय झाले आहेत. त्यामुळे निवडणूक सहा महिन्यांत होणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

दरम्यान, भाजपाचा प्रमुख अजेंडा असलेला अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराचे राष्ट्रार्पण जानेवारी-२०२४ मध्ये होत आहे. हा भाजपासाठी प्रचाराचा प्रमुख मुद्दा राहणार आहे. त्यानंतर लगेचच दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू होतील. तत्पूर्वीच निवडणुकीची घोषणा करण्यात येईल. परीक्षांचा कालावधी संपला की मार्च- एप्रिल- २०२४ मध्ये लोकसभा निवडणूक प्रक्रिया सुरू होवून मतदान होईल. मे- २०२४ मध्ये नवीन पंचवार्षिकसाठी पंतप्रधान शपथ घेतील. देशभरात भाजपाचा प्रचार शिगेला पोहोचलेला असतानाच या पोषक वातावरणाचा फायदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी घेतला जाणार आहे. कारण, विधानसभा निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बहुमत निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वीच मे- २०२४ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची रणनिती आहे.

### इच्छुकांसाठी अवघा सहा महिन्यांचा कालावधी...

महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांसाठी अवघ्या ६ महिन्यांचा कालावधी तयारीकरीता मिळणार आहे. जानेवारीमध्ये राम मंदिराच्या राष्ट्रार्पण सोहळ्याचे प्रचंड 'ब्रँडिंग' भाजपा करणार असून, त्याचा फायदा मार्च-एप्रिलमधील लोकसभा निवडणुकीत होईल. हा 'माहोल' करुन स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुमत मिळवण्यासाठी भाजपा 'फिल्डिंग' लावणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था महायुतीचे घटक पक्ष स्वतंत्रपणे लढणार आहेत. त्यामुळे या निवडणुकीत बहुमत ऑक्टोबर- नोव्हेंबर-२०२४ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकींची मोर्चेबांधणी करण्यात येत आहे. त्यामुळे इच्छुकांना लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने कामाला लागण्याच्या सूचना दिल्याचे सांगण्यात येत आहे.

# महाराष्ट्रातील सर्वात मोठे अश्व- देशी गोवंश पशु प्रदर्शन

## आ. महेश लांडगे यांच्या वाढदिवसाचे निमित्त : अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचा लक्षवेधी उपक्रम

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गोवंश संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठे अश्व व देशी गोवंश पशू प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पशू पालकांना 'रेकॉर्ड ब्रेक' उपक्रमात सहभागी होण्याची संधी निर्माण झाली आहे.**



बैलगाडा शर्यत बंदी उठवण्यासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत यशस्वी लढा उभारणारे आणि गोसंवर्धनासाठी चळवळ उभी करणारे गोरक्षक आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या पुढाकाराने मोशी येथील आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे दि. २५ व २६ नोव्हेंबर २०२३ रोजी भव्य देशी गोवंश प्रदर्शन व पशु आरोग्य शिबीर भरविण्यात येणार आहे.

भारतातील सर्व जातीचे अश्व व गोवंश पशू प्रदर्शन तसेच आरोग्य शिबीरासह एकूण १७ प्रकारातील पशूंचा' रॅम्प वॉक' असलेले हे देशातील पहिले देशी गोवंश पशू प्रदर्शन आहे. देवनी, खिल्लार, लाल कंधारी, साहिवाल, लाल सिंधी, गीर, ओंगोले, वेचूर अशा विविध गोवंशासाठी प्रजातिनिहाय स्पर्धा घेण्यात येणार आहे.

स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे क्रमांक काढण्यात येणार आहेत. पहिल्या क्रमांकाच्या गोवंश आणि पशूंचे 'रॅम्प वॉक' होणार आहे, असा प्रयत्न भारतात प्रथमच होत आहे.

कोविड सारख्या महामारीच्या काळात देशी गोवंशाचे आणि त्याच्या उत्पादनाचे महत्त्व जगाला कळले आहे. त्यामुळे याबाबत जनजागृती आणि गो संवर्धनाचा संदेश तळागाळात पोहोचला पाहिजे.

तसेच, पुणे जिल्ह्यातील शासकीय व अशासकीय शाळांच्या विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी. ज्यामुळे भावी पिढीलासुद्धा गोवंशाचे महत्त्व कळेल.

गतवर्षी खिल्लार या एकाच प्रकारातील प्रदर्शनामध्ये २५० हून अधिक गोवंश सहभागी झाले होते. यावर्षी विविध देशी प्रजातींचे दीड हजार पशू प्रदर्शनामध्ये सहभागी होतील, असा अंदाज आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक...

देशी गोवंश प्रदर्शन व पशु आरोग्य शिबीरामध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. त्यासाठी HTTPS://FORMS.GLE/HBZTJLMKJYEN8CVF9 या लिंकवर किंवा 93 79 90 90 90 या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. पहिल्या ५०० गोपालकांना या प्रदर्शनामध्ये सहभागी होण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. दि. ८ नोव्हेंबर ते दि. २० नोव्हेंबर २०२३ पर्यंत नोंदणी सुरू राहणार आहे. अखिल भारतीय बैलगाडा संघटना प्रमुख आयोजक असून, पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्रातील गोपालकांसाठी सुवर्ण संधी निर्माण झाली आहे.




**अलीकडे असा एकही दिवस जात नाही की, वन्य प्राण्यांचा उपद्रव, हल्ला, पिकांचे नुकसान, मानवी वस्तीवरील वावर यासंबंधीच्या बातम्या वाचायला मिळत नाहीत. राज्यात दररोज कुठे ना कुठे बिबट्याचा शेतकऱ्यावर हल्ला, रेडकं, वासरं, शेळ्या मेंढ्या पळवून नेणे, कोंबड्यांचा फडशा पाडणे. सोबत पिकांचे झालेले नुकसान, भाजीपाला पिके उद्ध्वस्त झाल्याच्या बातम्या आपण वाचतो.**

# शेतीतला उच्छाद थांबवायचा कसा?



मग शेतकऱ्यांनी केलेली उपाययोजना कशी उपयोगी ठरली नाही, त्यांनी वन विभागाकडे दाखल केलेली तक्रार, वनविभागाकडून त्यांच्या पद्धतीने त्यांनी केलेली कार्यवाही वगैरे स्थानिक वृत्तपत्रात चर्चिली जाते. शासन म्हणून मदत जाहीर केली जाते. प्रबोधन करा, उपाययोजना करा, लक्ष ठेवा अशा उपदेशांचा भडिमार केला जातो. वन्यप्राणी व मानव एकत्रितपणे शांत वातावरणात कसे राहातील यासाठीचे प्रयत्न व्हावेत, असे तज्ज्ञ मंडळी आवाहन करतात. सोबत काही सेवाभावी संस्था, वनविभागदेखील जाहिराती, भित्तिपत्रके, घडीपत्रिका काढून त्यांचे वाटप जंगलाशेजारील गावांत करतात; पण त्याचा परिणाम आणि होणारे नुकसान याचा अंदाज पुन्हा कोणीही घेताना दिसत नाहीत. किंबहुना त्यामध्ये वाढच होताना दिसत आहे. यामुळे वन विभाग व संबंधित इतर विभागांची या बाबतीत हतबलता दिसून येत नाही ना, अशी शंका घेण्यास फार मोठा वाव आहे. विदर्भ व कोकणातील अनेक शेतकऱ्यांचे या वन्य प्राण्यांमुळे – विशेषतः नीलगायी, डुक्कर, अस्वल, क्वचित, हरीण व माकडांच्या कळपांमुळे – होणारे नुकसान मोठे आहे. अनेकांना शेती विकावी लागली. जमिनी पडीक पडल्या आहेत. विदर्भातील शेतकऱ्यांच्या भावना खूप तीव्र आहेत. वन्य प्राण्यांचा मानवी वस्तीमध्ये वाढता वावर त्यांच्यामुळे मानवावरील हल्ले, त्यांना पकडणे पुन्हा त्यांच्या अधिवासात सोडणे, त्यावेळी होणारी गर्दी, होणारे अपघात हेदेखील आपण वाचले आहे, पाहिले आहे. इतकेच काय या बाबतीत मुंबई उच्च न्यायालयाने डिसेंबर २०२१ मध्ये चिंता व्यक्त केली होती. खरे तर राज्य सरकार, राज्याचा वनविभाग व नागरिकांना हा एक इशारा देऊन त्यावर उपाय शोधण्याची आवश्यकता व्यक्त केली होती. वन्यप्राण्यांच्या बाबतीत वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण, जंगल सफारीतील गाईड व पर्यटक आणि जंगलाशेजारील जनता यांना वन्यप्राण्यांच्या वर्तणुकीबाबत प्रशिक्षण, त्यांना जादा अधिकार उपलब्ध करून देणे, त्यांच्या अन्नाची तरतूद करणे, वन्य तृणभक्षी प्राण्यांची संख्या वाढवणे, जाळीदार बस, संरक्षित वाहने, याबाबत खंडपीठाने निर्देश दिले होते. अगदी अलीकडे सांगली जिल्ह्यातील एका लोकप्रतिनिधींनी अशा वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे होणारे नुकसान, प्राण्यांकडून मानवी हत्या यामुळे वनविभागाच्या अधिकाऱ्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारादेखील दिला आहे. एकंदरीत इतक्या सर्व प्रयत्नांनी व न्यायव्यवस्थेने नोंद घेऊनदेखील अशा घटना कमी होताना दिसत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये वन्यप्राण्यांना घाबरवण्यासाठी वेगवेगळ्या आवाजाची यंत्रे बसवणे, पाळीव प्राण्यांचे विमा उतरवणे, मृत्यूपश्चात अनुदानामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करणे, याचबरोबर वेगवेगळ्या प्राण्यांसाठी प्रजातीनिहाय विशिष्ट उपायदेखील केले जातात. सुगंधी द्रव्याचा वापरदेखील करण्याविषयी सुचवले जाते. अनेक राज्यांत गर्भनिरोधक लस, इंजेक्शनचा वापर केला जातो. अनेक वेळा खाद्यातून अशा औषधाचा वापर करण्याबाबत प्रयत्न आणि प्रयोग सुरू आहेत. या सर्व उपायांना मर्यादा आहेत त्यामुळे त्याला म्हणावे इतके यश मिळताना दिसत नाही हे कोणीही मान्य करेल. वन्य प्राण्यातदेखील मांसाहारी, शाकाहारी आणि मिश्राहारी असे प्रकार आहेत. ते एकमेकाला पूरक आहेत. मांसाहारी वाघ, सिंह, बिबटे, चित्ते यांना जगण्यासाठी शाकाहारी म्हणजे तृणभक्षी प्राणी- नीलगायी, हरण, चितळ, सांबर, डुक्कर, माकडे, रानगवे यांची संख्या योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे. अन्यथा अन्नाच्या शोधात वाघ, बिबटे मानवी वस्तीत येणार हे निश्चित. जर त्यांची संख्या कमी झाली तर मात्र तृणभक्षक प्राण्यांची संख्या वाढेल आणि ती इतकी वाढेल की जंगलातील खाद्याबरोबरच आसपासच्या शेतातील पिकांचे, भाजीपाल्यांचे खूप मोठे नुकसान करताना दिसतील. हा समतोल राखला गेला पाहिजे.

## संपादकीय »

# ‘वर’चे वर!

***दीपावली हा लक्ष्मीचा उत्सव. यात लक्ष्मीपूजनास फार महत्त्व. व्यापारी मंडळी या दिवशी चोपडीपूजन करतात आणि भांडवली बाजाराचे तर एक विशेष सायंकालीन सत्र भरते.***

दीपावली हा लक्ष्मीचा उत्सव. यात लक्ष्मीपूजनास फार महत्त्व. व्यापारी मंडळी या दिवशी चोपडीपूजन करतात आणि भांडवली बाजाराचे तर एक विशेष सायंकालीन सत्र भरते. ‘मुहूरत ट्रेडिंग’ असेच त्यास म्हणतात. यावरून दीपावली आणि लक्ष्मी यांचे नाते लक्षात यावे. या दिवसात घरगुती खरेदी मोठ्या प्रमाणावर होत असते. फुललेले बाजार आणि प्रकाशलेला आसमंत हे दृश्य विहंगमच. त्यामुळे या काळात अर्थस्थितीविषयी एक प्रकारची सकारात्मकता निर्माण होते. हे सर्व यंदाही होईल. शहरांतील महादुकाने, मार्ग, फुललेल्या बाजारपेठा इत्यादींमुळे सारे काही कसे आलबेल आहे असे अनेकांस वाटेल. ज्यांचे आलबेल आहे त्यांना त्यांस तर अधिक आलबेल झाल्याचे वाटेल. असे होते. आपले उत्तम असले की जगाचेही चांगले चालले असल्याचे वाटते आणि आपल्या हलाखीच्या काळात जगाचेही काही बरे दिसत नाही.

**होमो सेपियन्स ही पृथ्वीवरची सगळ्यात प्रगत अशी मानवी प्रजाती मानली जाते. त्यांच्याही आधी होती ते निएंडरथल्स. त्यांच्या तुलनेत होमो सेपियन्स अधिक प्रगत आणि बुद्धिमान मानले जातात. होमो सेपियन्सचाच पृथ्वीवरचा वावर सुरू होऊन हजारो वर्षे लोटली. पण असे असले तरी आपण मूळच्या निएंडरथल्सपेक्षा फारसे वेगळे नाही आहोत, असे मला वाटते. ते लढाया नियमांशिवाय लढले आणि आपणही नियम न पाळताच युद्धे लढत आहोत.**

# आपण अजूनही आदिमानवच!



प्राचीन युद्धे खरोखरच सुसंस्कृत पद्धतीने आणि काही नियमांनुसार लढली गेली. पण आधुनिक काळात तसे होत नाही. आज रशिया आणि युक्रेन तसेच इस्रायल आणि हमास यांच्यात जी युद्धे लढली जात आहेत ती अत्यंत क्रूरपणे लढली जात आहेत. अंदाधुंद बॉम्बस्फोट झाले आहेत. युक्रेन आणि गाझामध्ये शहरे आणि गावे गाडली गेली आहेत. रुग्णालये आणि शाळा उद्ध्वस्त झाल्या आहेत. लहान मुले, महिला, वृद्ध आणि रुग्णांसह हजारो लोकांचा बळी गेला आहे. विस्थापितांना छावण्यांमध्ये ठेवण्यात आले आहे. तिथे मूलभूत सुविधाही मिळू शकत नाहीत अशी परिस्थिती आहे. हजारो बेघर लोकांना शेजारच्या देशांत स्थलांतरित व्हावे लागले आहे. वीज आणि पाणीपुरवठा खंडित झाला आहे. अन्नपुरवठा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाला आहे. औषधांचा तुटवडा आहे. मदत साहित्य घेऊन जाणारे ट्रक थांबवण्यात आले आहेत.

हे युद्ध कशासाठी सुरू आहे? रशिया-युक्रेन युद्धात वर्चस्वाचा मुद्दा आहे. युक्रेन १९२२ ते १९९१ दरम्यान सोव्हिएत युनियनचा भाग होता. रशियन वंशाचे हजारो लोक युक्रेनच्या काही भागात स्थायिक झाले आणि हळूहळू त्यांचे वर्चस्व वाढत गेले. ते प्रबळ होत गेले.

स्वातंत्र्यानंतर, युक्रेन हा देश नाटोमधले देश आणि रशिया यांच्यातील बफर क्षेत्र होता. युक्रेन नाटोमध्ये सामील झाले तर तो नाटोचे सैन्य आपल्या सीमेपर्यंत आणेल अशी भीती रशियाला वाटत आहे. म्हणून, रशियाला युक्रेन एक ‘तटस्थ’ देश असायला हवा आहे. युक्रेनच्या ज्या भागात रशियन वंशाचे लोक स्थायिक झाले आहेत, तो भाग रशियाला जोडून घ्यायचा आहे. जमिनीचा काही भाग जोडण्यासाठी आणि बाकीच्या गोष्टी मार्गस्थ करण्यासाठी, हे जमिनीवरचे युद्ध आहे. इस्रायल-हमास युद्धातही जमिनीच्या मुद्द्यावरूनच संघर्ष सुरू आहे. ज्यू लोकांनी आपली जमीन बळकावली आहे, असा सर्व पॅलेस्टिनींचा विश्वास आहे. त्यातले काही हमासचे प्रतिनिधित्व करतात. त्या भूभागाला पॅलेस्टाईन असे म्हटले जात असे आणि त्यावर अरब, ज्यू आणि ख्रिश्चनांचा ताबा होता. इस्रायल या देशाची निर्मिती संयुक्त राष्ट्रांच्या आदेशानुसार झाली आणि ज्यू लोक १९४८ पासून त्या भूभागावर स्थायिक झाले. आधुनिक इस्रायल हा एक शेजारच्या शत्रूपासून स्वतःचा बचाव करण्याची क्षमता असलेला बलवान देश आहे. इस्रायल ही या परिसरातील एकमेव अणुशक्ती आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनवार जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला 'महाईन्यूज'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भुजबळांमागे मास्टरमाइंड कोण?

## » भुजबळांचा सरसकट मराठा आरक्षणाला विरोध

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून महाराष्ट्रातलं राजकीय वातावरण तापलं आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याचं आश्वासन दिल्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण मागे घेतलं आहे. राज्यातील मराठा समुदायाला सरसकट कुणबी दाखले द्यावेत आणि ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावं, अशी प्रमुख मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे. मनोज जरांगेंच्या या मागणीला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी विरोध केला आहे.**

भुजबळ यांच्या विधानावर आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आम्हाला ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण हवं आहे, असा पुनरुच्चार त्यांनी केला. तसेच आम्हाला ओबीसीतून आरक्षण मिळेल, असा विश्वासही मनोज जरांगेंनी व्यक्त केला आहे. ते प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते. यावेळी छगन भुजबळांमागे मास्टरमाइंड कोण आहे? असा सवाल विचारला असता मनोज जरांगेंनी हटके उत्तर दिलं आहे. "आयला हे लफडं, मला नाही कळायचं..ब्वा..इतक्या लांब आपलं जुळू शकतं नाही. तेच एवढे मोठे मास्टरमाइंड आहेत आणि आता त्यांच्यामागे कोण मास्टरमाइंड असेल? ते कुणाला मास्टरमाइंड म्हणून टिकू देतील, असं वाटत नाही," अशी प्रतिक्रिया जरांगे पाटील यांनी दिली.




मराठा आरक्षणाला मी किंवा माझ्या पक्षाने तसंच समता परिषदेने कधीही विरोध केलेला नाही. पण आम्ही पहिल्यापासून हे निश्चितपणे म्हणालो आहोत की मराठा समाजाला आरक्षण देताना इतर कुणाच्याही आरक्षणाला धक्का लागता कामा नये. वेगळं आरक्षण त्यांना द्या, सर्वोच्च न्यायालयात ज्या त्रुटी असतील त्या दूर करा आणि मराठा बांधवाना आरक्षण द्या असं आता छगन भुजबळ यांनी म्हटलं. ओबीसीमध्ये अतिशय लहान लहान जाती आहेत. धनगर, वंजारी, कुणबी, माळी, तेली, सुतार, लोहार, कुंभार असे अनेक लोक त्यात आहे. त्यामुळे ओबीसींमधून आरक्षण दिलं तर कुणाचाच फायदा होणार नाही असंही भुजबळ म्हणाले. राज्यात मराठ्यांना अवैधपणे कुणबी प्रमाणपत्र वाटप सुरु असून मराठ्यांचे बॅक डोअरने ओबीसीकरण केले जात आहे. राज्यात ओबीसींचे आरक्षण संपविण्याचे हे षडयंत्र आहे, असा सनासनाटी आरोप अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केला. मराठा आरक्षणाला आमचा कधीही विरोध नाही किंवा नव्हता, पण त्यांना ओबीसीतून सरसकट आरक्षण देण्यास आणि सरसकट कुणबी प्रमाणपत्र वाटप करण्यास विरोध आहे, असेही भुजबळ म्हणाले. बीड जिल्ह्यातील जाळपोळीची पाहणी करून आल्यानंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये सोमवारी (दि. ६) पत्रकारांशी ते बोलत होते. भुजबळ म्हणाले, मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांचे अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरु असताना माजलगाव आणि बीडमध्ये आ. प्रकाश सोळंके, आ. संदीप क्षीरसागर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, समता परिषदेचे सुभाष राऊत यांची घरे, हॉटेल्स आणि कार्यालये टार्गेट करून फोडण्यात आली. जाळपोळ केली. यात कोट्यवधींचे नुकसान झाले. मराठा आरक्षणाला मी, माझ्या पक्षाने, माझ्या समता परिषदेने कधीही विरोध केला नाही. ओबीसी आरक्षणाला धक्का लागता कामा नये, मराठ्यांना वेगळे आरक्षण द्या, अशी भूमिका मी सुरुवातीपासून घेतली. हीच भूमिका शरद पवार, अजित पवार, एकनाथ शिंदे, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसच्या नेत्यांनी घेतलेली आहे, असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले. राज्यात ओबीसींची संख्या ५४ टक्क्यांहून अधिक आहे. त्यांना २७ टक्के आरक्षण आहे. ओबीसींमध्ये ३७५ जातींचा समावेश आहे. या गोरगरिब समाजाच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये, पण राज्यात सध्या दहशत निर्माण करून आमदारांची घरे जाळली जात आहेत. हल्ले करायचे असतील तर तुम्हाला हा सावधानतेचा इशारा आहे, असे समजावे. आम्ही बोललो तर आमच्या जीवावर उठणाऱ्या शक्तीचा शोध घ्यायला हवा. सभेला जमीनी देणाऱ्यांना सरकारने मदत दिली. आता ज्यांची घरे जाळली त्यांना सरकारने भरपाई द्यावी, अशी मागणी भुजबळ यांनी केली.

### ओबीसींची जनगणना करा

» राज्यात ओबीसींची जनगणना करावी, अशी आग्रही मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली. बिहारमध्ये ही जनगणना केल्यावर ६३ टक्के ओबीसी आढळले. महाराष्ट्रातही हा आकडा ५४ टक्क्यांहून अधिक आहे. त्यापेक्षा हा आकडा कधीही कमी होणार नाही, असे भुजबळ म्हणाले. राज्यात मराठा समाजाला बेकायदेशीरपणे कुणबी प्रमाणपत्र वाटप केले जात आहे. पाच हजार पुराव्यांचे कधी १३ हजार झाले हा संशोधनाचा विषय आहे. आता तर प्रत्येक जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्र वाटपाची दुकाने उघडली आहेत. मनोज जरांगेंना त्यांच्या लेकरा-बाळांचे पडले आहे, जी घरे जाळली त्या घरातही लेकरं-बाळं राहतात. त्यांना तेथील लेकरं-बाळं दिसली नाहीत का? असा सवालही भुजबळ यांनी केला.

# घरी बसणाऱ्यांना जनतेनं घरी बसवलं!


## » भाजपाने हिंदूत्वाची मालकी घेतली नाही उद्धव ठाकरे प्रत्युत्तर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील २३५९ ग्रामपंचायतींसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल आज ( ६ नोव्हेंबर ) हाती आले. या निवडणुकीत भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने जोरदार आघाडी घेतली आहे. तर, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाची पिछेहाट झाली आहे.**

यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना ( ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केलं होतं. "घरी बसणाऱ्यांना जनतेनं घरी बसवले," अशी टीका मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केली होती. याला उद्धव ठाकरेंनी सडेतोड प्रत्युत्तर दिलं आहे. "खाल्ल्या घरचे वासे मोजणाऱ्यांनी आम्हाला शिकवू नये," अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना सुनावलं आहे. पत्रकार राहुल गडपाले यांच्या 'अवतरणार्थ' पुस्तक प्रकाशन सोहळ्यात उद्धव ठाकरे बोलत होते. उद्धव ठाकरे म्हणाले, "शिवसेना काँग्रेसबरोबर गेली म्हणजे 'शिवसेनेची काँग्रेस’ झाली म्हणतात. गेली ३० वर्ष आम्ही भाजपाबरोबर होतो. मात्र, आमचा कधी भाजपा झाला नाही. मग, काँग्रेस कसा होईल? शिवसेनेनं भाजपाला सोडलंय, हिंदूत्वाला नाही. भाजपाने हिंदूत्वाची मालकी घेतली नाही. मला भाजपाचं हिंदूत्व मान्य नाही," अशी टीकाही उद्धव ठाकरेंनी केली आहे. "फक्त टोमणे, आरोप-प्रत्यारोपात वर्ष घालवले. ज्यांनी मतदारांशी आणि बाळासाहेबांच्या विचारांशी गद्दारी केली, त्यांना लोकांनी नाकारलं आहे. मतदारांशी प्रतारणा केलेल्यांना जनतेनं घरी बसवलं. असेही घरी बसण्याची सवय त्यांना होतीच," असं म्हणत मुख्यमंत्री शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला होता. मी फोटोग्राफी करायचो, व्यंगचित्र काढत होतो. पण, मुख्यमंत्री होईन, असं कधीच वाटलं नव्हतं. मी मुख्यमंत्री होण्यास शरद पवार जबाबदार आहेत. मुख्यमंत्री असताना जमेल ते काम केलं, असं विधान शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. पत्रकार राहुल गडपाले यांच्या 'अवतरणार्थ' पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. "राहुल गडपालेंनी सांगितलं की, 'बऱ्याच क्षेत्राचा अभ्यास केला. मात्र, अंतिम ज्या क्षेत्रात रमले त्याचा अभ्यासच केला नव्हता.' तसेच माझे झाले आहे.




### मी फेकाफेकी करणारा नाही

» "मला या कार्यक्रमात अमरावतीकर दिसत आहेत. मी जर असं म्हणलो की, 'भाई और बहनो, मेरा अमरावतीसे बोहोत पुराना रिश्ता है.' कारण, माझी आजी ही अमरावतीतील परतवाड्याची आहे. मी फेकाफेकी करणारा नाही. उगाचच सगळीकडे 'करीबी रिश्ता है' सांगत नाही. जे रिश्ते आहेत ते आहेत. जे नाहीत ते नाही," असा टोला उद्धव ठाकरेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अप्रत्यक्षपणे लगावला आहे.

# दिल्लीत सम-विषम नियम लागू!

## बांधकामं बंद, शाळा आणि कार्यालयांसाठी नवे नियम

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतल्या वाढत्या प्रदूषणावर उपाययोजना राबवण्यासाठी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय बैठक काही वेळापूर्वी पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. दिल्ली सरकारने १३ ते २० नोव्हेंबर या आठ दिवसांसाठी राज्यात वाहनांसाठी सम आणि विषम (ऑड अँड इव्हन) नियम लागू केले आहेत.**



दिल्लीत पुढचे काही दिवस बांधकामं बंद ठेवली जातील. १० नोव्हेंबरपर्यंत १० वी आणि १२ वी या दोन इयत्ता वगळता इतर सर्व वर्गांमधील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिकवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर दिल्लीत बीएस-३ पेट्रोल आणि बीएस-४ डिझेल वाहनांवरील बंदी कायम राहील. दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी पत्रकार परिषद घेऊन आजच्या उच्चस्तरीय बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती दिली. दिल्लीत ३० ऑक्टोबरपासून प्रदूषण वाढलं आहे. या प्रदूषणाचं विश्लेषण करणाऱ्या संशोधक आणि तज्ज्ञांनी सांगितलं की दिल्लीच्या हवेचा वेग मंदावला आहे. दुसऱ्या बाजूला तापमानही वेगाने घटलं आहेच. त्यामुळे दिल्लीतल्या समर-व्हिंटर ॲक्शन प्लानवर (हिवाळा आणि उन्हाळ्यातील वातावरणीय आव्हानांशी लढण्यासाठीची कृती योजना) ३६५ दिवस काम केलं जात आहे. दरम्यान, आजच्या बैठकीत दिल्लीत सरकारी आणि खासगी कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची मुभा देण्याबाबत (वर्क फॉर्म होम) निर्णय घेतला नाही. याबाबत विचार करून आगामी काळात निर्णय घेतला जाईल. दिल्लीतील प्रदूषणाने अतिधोकादायक स्तर ओलांडला असून राजधानी परिक्षेत्रात शुक्रवारी काही ठिकाणी हवेचा गुणवत्ता निर्देशांक ५०० या चिंताजनक पातळीवर पोहोचला होता. दिल्लीच्या सीमेवरील गाझियाबाद, नोएडा, फरिदाबाद भागांमध्ये तर शुक्रवारी प्रदूषणाचा स्तर सुमारे ७०० पर्यंत गेला होता. धूर-धुळीमुळे दिल्लीचे आकाश पूर्णपणे झाकोळले गेले आहे. पुढील दोन आठवडे तरी हीच परिस्थिती कायम राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दिल्ली शहरातील वाहनांच्या प्रदूषणामध्ये पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील शेत जाळण्याच्या घटनांमुळे होणाऱ्या प्रचंड धुराची भर पडली आहे. पंजाबमध्ये गुरुवारी एका दिवसामध्ये शेतातील खुंट जाळण्याचे सुमारे दोन हजार प्रकार घडल्याचे निदर्शनास आले. पुढील काही दिवसांमध्ये त्यांत आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने दिल्लीकरांना गंभीर प्रदूषणाला सामोरे जावे लागणार असल्याचा इशारा केंद्रीय यंत्रणांनी दिला आहे.

### छत्तीसगडमध्ये कारवाईची अपेक्षा

» दिल्लीतल्या वाढत्या प्रदूषणावर उपाययोजना राबवण्यासाठी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय बैठक काही वेळापूर्वी पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. दिल्ली सरकारने १३ ते २० नोव्हेंबर या आठ दिवसांसाठी राज्यात वाहनांसाठी सम आणि विषम (ऑड अँड इव्हन) नियम लागू केले आहेत. दिल्लीतील प्रदूषणाने अतिधोकादायक स्तर ओलांडला असून राजधानी परिक्षेत्रात शुक्रवारी काही ठिकाणी हवेचा गुणवत्ता निर्देशांक ५०० या चिंताजनक पातळीवर पोहोचला होता. दिल्लीच्या सीमेवरील गाझियाबाद, नोएडा, फरिदाबाद भागांमध्ये तर शुक्रवारी प्रदूषणाचा स्तर सुमारे ७०० पर्यंत गेला होता. धूर-धुळीमुळे दिल्लीचे आकाश पूर्णपणे झाकोळले गेले आहे. पुढील दोन आठवडे तरी हीच परिस्थिती कायम राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# इंडिया आघाडीत बिघाडी?

## अखिलेशची काँग्रेसवर सडकून टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेश विधानसभेच्या निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. अशातच इंडिया आघाडीत फूट पडल्याचं दिसत आहे. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांची मध्य प्रदेशातील टीकमगड येथे प्रचार सभा झाली. यावेळी अखिलेश यादव यांनी काँग्रेसला लक्ष्य केलं आहे. काँग्रेस खूप चालू ( चतूर ) पक्ष आहे. काँग्रेसने आम्हाला धोका दिला आहे. तर, तुम्हालाही धोका देऊ शकते, असा हल्लाबोल अखिलेश यादव यांनी केला आहे.**



### दोन्ही पक्षांना समाजाच्या ताकदीचा अंदाज

» काँग्रेसने जातनिहाय जनगणना आणि मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी थांबवली होती. काँग्रेस आणि भाजपा दलित, मागासवर्गीय आणि आदिवासी समाजाला आपल्याकडं ओढण्यासाठी जातनिहाय जनगणणा आणि आरक्षणाबाबत बोलत आहेत. कारण, दोन्ही पक्षांना या समाजाच्या ताकदीचा अंदाज आला आहे," असं अखिलेश यादव यांनी म्हटलं.

"याआधी काँग्रेसने जातनिहाय जनगणना आणि मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी थांबवली होती. काँग्रेस आणि भाजपा दलित, मागासवर्गीय आणि आदिवासी समाजाला आपल्याकडं ओढण्यासाठी जातनिहाय जनगणना आ णि आरक्षणाबाबत बोलत आहेत. कारण, दोन्ही पक्षांना या समाजाच्या ताकदीचा अंदाज आला आहे," असं अखिलेश यादव यांनी म्हटलं. अखिलेश यादव यांनी मध्य प्रदेशातील महिला, दलित आणि आदिवासींवरील अत्याचारावरून भाजपा सरकारवर टीकास्र डागलं आहे. "देशात महिलांवर सर्वाधिक अत्याचार मध्य प्रदेशात होत आहेत. दलित आणि आदिवासींवरही मध्य प्रदेशात अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात घडल्या आहेत," असेही अखिलेश यादव यांनी सांगितलं. काँग्रेस आणि समाजवादी पक्ष इंडिया आघाडीतील घटकपक्ष आहेत. पण, १७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांनी २३० जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत. या निवडणुकीत अखिलेश यादव आणि काँग्रेसचे नेते, कमलनाथ यांच्यात जागावाटपावरून तणाव निर्माण झाला होता.

# विद्यार्थिनींना सॅनिटरी मोफत मिळणार का?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

शाळेतील विद्यार्थीनीना मोफत सॅनिटरी नॅपकिन मिळावे, याकरता सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला एकसमान राष्ट्रीय धोरण आखण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार, या राष्ट्रीय धोरणाचा मसुदा तयार करण्यात आल्याची माहिती केंद्र सरकारने आज सर्वोच्च न्यायालयात दिली. इयत्ता ६ ते बारावीतील विद्यार्थीनीना मोफत सॅनिटरी नॅपकिन्स, नॅपकिन्सची विल्हेवाट आणि स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध करण्याच्या मागणीकरता सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेवर सुनावणी सुरू असताना केंद्राने ही माहिती दिली. शाळेत जाणाऱ्या मुलींसाठी मोफत सॅनिटरी नॅपकिन्सचे वितरण करण्यासाठी राष्ट्रीय धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. केंद्राने या धोरणाबाबत लोकांचं मत जाणून घेण्यासाठी चार आठवड्यांचा कालावधी मागितला आहे, असे वृत्त लाईव्ह लॉ या कायदेशीर वृत्त देणाऱ्या संकेतस्थळाने दिले आहे. "शालेय मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन्सच्या वितरणासाठी पाळल्या जाणाऱ्या पद्धतींमध्ये एकसमानता आणणे, पुरेशा स्वच्छता सुविधा आणि अधिक स्वच्छतागृहांची खात्री या धोरणामध्ये करावी", अशा सूचना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी दिल्या आहेत.

ते म्हणाले की, पुढील सुनावणीत या धोरणाविषयी माहिती दिली जावी. तामिळनाडूमध्ये प्रत्येकी ६ नॅपकिन्स असलेली १८ पाकिटे दिली जातात. मात्र, हे देखील मुलींसाठी अपुरे आहेत. तसंच, सॅनिटरी नॅपकिन्सचा पुरेसा पुरवठा आणि वितरणासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारशी समन्वय साधावा, अशीही सूचना दिली आहे.

# रिचानं नेटकऱ्यांचे टोचले कान



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या रॉय ही काही दिवसांपूर्वी एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आली होती. तिनं पॅरिसच्या फॅशन वीकमध्ये रॅम्प वॉक केले होते. त्यातील काही फोटो व्हायरल झाले होते. त्यावरुन ऐश्वर्याला ट्रोल करण्यात आले होते. या सगळ्यात अभिनेत्री रिचानं ऐश्वर्याची बाजू घेतली आहे. यापूर्वी ऐश्वर्या आणि रिचानं सरबजितमध्ये एकत्र काम केले होते. त्या चित्रपटामध्ये रणदीप हुडानं केलेली भूमिका लोकप्रिय ठरली होती. रणदीपच्या भूमिकेचे मोठ्या प्रमाणावर कौतुकही झाले होते. ऐश्वर्या जेव्हा त्या पॅरिसच्या रॅम्प वॉकमध्ये सहभागी झाली होती तेव्हा तिला ट्रोल करण्यात आले होते. या सगळ्यावर ऐश्वर्यानं तिला ट्रोल करणाऱ्यांवर कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. फुकरे तीन मधून भोली पंजाबनच्या भूमिकेत असणाऱ्या रिचाची लोकप्रियता मोठी आहे. तिचा चाहतावर्गही मोठा आहे. रिचा ही नेहमीच तिच्या सडेतोड प्रतिक्रियेसाठी ओळखली गेलेली सेलिब्रेटी आहे. एका मुलाखतीमध्ये रिचाला ऐश्वर्या रॉयच्या ट्रोलिंगवरुन प्रश्न विचारण्यात आला होता.

# आलिया भट्टची खास पोस्ट



अभिनेता रणबीर कपूर (RANBIR KAPOOR) यांची मुलगी राहाचा आज पहिला वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त कपूर कुटुंबीयांनी सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर केला आहेत. आता लेकीच्या वाढदिवसानिमित्त आलियानं नुकतीच एक स्पेशल पोस्ट शेअर केली आहे. आलियानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोंनी अनेकांचे लक्ष वेधले आहेत. आलिया भट्टनं सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत. या फोटोमध्ये राहानं एका केकवर हात ठेवलेला दिसत आहे. तर दुसऱ्या फोटोमध्ये राहानं हातात फुल धरलेलं दिसत आहे. आलियानं सोशल मीडियावर शेअर केलेल्या फोटोमध्ये राहाचा चेहरा दिसत नाहीये. आलियानं फोटोला कॅप्शन दिलं, "आमचा आनंद, आमचं आयुष्य आणि आमच्या जीवनातील प्रकाश, आपण हे गाणं ऐकत आहोत आणि तू माझ्या पोटात लाथा मारत आहेस, हे सर्व परवा घडलं असं मला वाटत आहे. माझ्याकडे भावना मांडण्यासाठी शब्द नाहीत पण तू आमच्या आयुष्यात आहेस, हे आमचं भाग्य आहे. तू आम्हाला एका चविष्ट केकच्या तुकड्याप्रमाणे वाटत आहेस. वाढदिवसाच्या शुभेच्छा बेबी टायगर, आम्ही तुझ्यावर खूप प्रेम करतो." राहाची आजी नीतू कपूर आणि सोनी राजदान यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट शेअर केल्या आहेत. आलियाची आई सोनी राजदान यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये लिहिलं आहे.

# शुभमन गिलला डेट करतेय का? विचारताच सारा हसली

गेल्या काही दिवसापासून करण जोहर त्याचा लोकप्रिय टॉक शो कॉफी विथ करण मुळे चर्चेत आहे. यंदा कॉफी विथ करणचा 8 वा सीझन आहे. आतापर्यंत या शोचे दोन भाग रिलिज झाले आहेत. या भागाची सुरुवात दीपिका पादूकोण आणि रणवीर सिंहच्या जोडीने झाली. त्यानंतर या शोमध्ये देओल भावंडं आलीत. आता या सिझनचा तीसरा एपिसोड रिलिज होणार आहे ज्यात दोन मैत्रिणीची जोडी पहायला मिळणार आहे. करणच्या शोमध्ये आता येणारी पुढची जोडी आहे सारा अली खान आणि अनन्या पांडेची. या शो दरम्यान करण जोहर सारा आणि अनन्याला त्यांच्या लव्ह लाईफबद्दल विचारताना दिसला. यावेळी करण आणि साराने अनन्या चिडवले. तर तिनेही तिच्या आणि आदित्यच्या डेटिंगवर चर्चा केली. निर्मात्यांनी शो चा एक प्रोमो सोशल मिडियावर शेयर केला आहे ज्यात सारा अली खान ही तिच्या आणि शुभमन गिलच्या डेटिंग अफवांवर स्पष्टपणे बोलताना दिसली. मात्र यावेळी तिने एक मोठी हिंटही दिली. करण जोहरने देखील त्याच्या इंस्टाग्रामवर शोचा नवीनतम प्रोमो पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये तो सारा अली खान आणि अनन्या पांडेसोबत बोलताना दिसत आहे. या व्हिडिओमध्ये करण साराला विचारतो की, तुझ्या आणि शुभमन गिलच्या डेटिंगबद्दल खूप अफवा पसरत आहे यावर उत्तर देताना सारा अली खान हसते आणि म्हणते, " सारा का सारा दुनिया गलत सारा के पीछे पडा है". त्यानंतर सर्वच हसतात. काही दिवसांपूर्वी भारतीय क्रिकेटर शुभमन गिल आणि सारा अली खान यांना एकत्र पाहिल्यानंतर दोघांच्या डेटिंगच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र त्यावेळीही साराने या अफवा खोट्या असल्याच्या सांगितल्या होत्या. मात्र त्यानंतर शुभमन गीलचे नाव सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकरसोबत जोडले गेले होते. सारा तेंडुलकर आणि शुभमनला अनेकवेळा एकत्र स्पॉट करण्यात आले आहे. त्याचे व्हिडिओ आणि फोटोही खुप व्हायरल झाले होते. त्यातच अलीकडेच सारा तेंडुलकर एका मॅचमध्ये शुभमन गिलला चिअर करण्यासाठी आली होती. त्यावेळी गीलच्या अर्धशतकावर साराने स्टँडिंग ओव्हेशन दिले. त्यामुळे दोघांच्या डेटिंगच्या अफवांना पुन्हा हवा मिळाली. आता त्यातच करण जोहरच्या शोमध्ये सारा अली खानने सर्व लोक चुकीच्या सारा मागे धावत असल्याचं सांगितलं. आता यामुळे साराच्या या वक्तव्यानंतर शुभमन सारा अली खानला नाही तर सारा तेंडुलकरला डेट करत असल्याची हिंट सारा अली खानने दिल्याचे बोलले जात आहे.

# ये रिश्ता क्या कहलाता है' ची अभिरा असं का म्हणते?

टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री अभिरा उर्फ समृद्धी ही एका वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आली आहे. तिनं एका मुलाखतीमध्ये जी प्रतिक्रिया दिली आहे त्यामुळे ती चाहत्यांच्या चर्चेचा विषय आहे. ती काय म्हणाली आहे हे आपण जाणून घेणार आहोत. अभिरा म्हणते, ये रिश्ता क्या कहलाता है या मालिकेची लोकप्रियता तुम्हाला दिसते. पण त्यामागील कलाकारांची मेहनतही तितकीच महत्वाची आहे. "या मालिकेचा दर्जा जपण्यासाठी सर्वांचे महत्वाचे योगदान आहे. 'ये रिश्ता क्या कहलाता है' ही मालिका नेहमीच प्रेक्षकांच्या पसंतीला उतरली आहे. आम्ही सर्वांनी या मालिकेसाठी आमचे सर्वोत्तम योगदान दिले आहे. आम्हांला आशा आहे की, प्रेक्षकही आमच्यावर आणि आमच्या मालिकेवर प्रेमाचा वर्षाव करतील", अशा शब्दांत समृद्धी शुक्ला उर्फ अभिरानं तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत. 'स्टार प्लस' वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'ये रिश्ता क्या कहलाता है'चे




नवे पर्व आता सुरु होणार आहे. नव्या पर्वात, समृद्धी शुक्ला आणि शहजादा धामी हे कलावंत मुख्य भूमिका साकारत मालिकेचा समृद्ध वारसा पुढे नेणार आहेत. समृद्धी शुक्ला (अभिरा), शहजादा धामी (अरमान), प्रतीक्षा होनमुखे (रूही) आणि शिवम खजुरिया (रोहित) यांचा परिचय करून देणाऱ्या या मालिकेची एक चित्तवेधक झलक प्रेक्षकांना अलीकडेच पाहायला मिळाली. या 'प्रोमो'त मालिकेच्या कथानकाने एक अनपेक्षित वळण घेतल्याचे पाहायला मिळाले होते, ज्यात एका क्लेशकारक घटनेमुळे अभिरा आणि अरमान लग्नाची गाठ बांधतात खरे, पण तरीही अरमान मात्र आजही रुहीच्या प्रेमात आहे, जिचे अरमानच्या भावाशी- रोहितशी लग्न होते. मालिकेच्या नव्या अध्यायात अभिरा, अरमान, रूही आणि रोहित यांच्या आयुष्यात उलगडत जाणारे रंजक नाट्य प्रेक्षकांना गुंतवून ठेवेल. 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकेच्या नव्या पर्वात मुख्य भूमिका निभावणारी समृद्धी शुक्ला उर्फ अभिरा हिच्या बोलण्यातून मालिकेसंदर्भातील तिची उत्कंठा व्यक्त होत होती. ती म्हणाली, "ये रिश्ता क्या कहलाता है या मालिकेबाबत एकाच वेळी मला खूप कुतूहलही वाटतंय आणि मी अस्वस्थही आहे; परीक्षेच्या निकालाची वाट पाहताना जसे होते, तशी माझी अवस्था आहे.

# बांगलादेशचा रोमहर्षक विजय!

## श्रीलंका उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाद ठरणारा तिसरा संघ

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषक २०२३ स्पर्धेतील ३८व्या सामन्यात बांगलादेश आणि श्रीलंका आमनेसामने आले होते. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या सामन्यात बांगलादेशने श्रीलंकेचा तीन विकेट राखून पराभव केला आहे. या पराभवासह श्रीलंकेचा संघ अधिकृतपणे उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ४९.३ षटकात २७९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात बांगलादेशने सात गडी गमावून २८२ धावा केल्या आणि सामना जिंकला.**

बांगलादेश आणि इंग्लंड आधीच उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडले होते. आता श्रीलंकाही अधिकृतपणे अंतिम चारच्या शर्यतीतून बाहेर आहे. श्रीलंकेचा सध्याच्या स्पर्धेतील हा सहावा पराभव आहे. विश्वचषकाच्या इतिहासात बांगलादेशने प्रथमच श्रीलंकेचा पराभव केला आहे. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेच्या संघाने ४९.३ षटकांत सर्व गडी गमावून २७९ धावा केल्या होत्या. चरित असलंकाने १०५ चेंडूत १०८ धावांची उत्कृष्ट शतकी खेळी केली. बांगलादेशकडून तनझिम हसनने गोलंदाजीत ३ बळी घेतले. तर शाकिब अल हसन आणि शोरीफुल इस्लाम यांना प्रत्येकी २ यश मिळाले. त्यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशने ४१.१ षटकांत ७ गडी गमावून तीन विकेट्स राखून सामना जिंकला. बांगलादेशने २८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नझमुल हसन शांतोने ९० आणि शाकिब अल हसनने ८२ धावा केल्या. श्रीलंकेच्या गोलंदाजांनी मेहनत घेतली असली तरी मधल्या षटकांमध्ये शाकिब आणि शांतो यांच्यात झालेल्या १६९ धावांच्या भागीदारीने सामन्याचे चित्र बदलले. या सामन्यात पुन्हा एकदा दिलशान मधुशंकाने श्रीलंकेसाठी सर्वाधिक तीन विकेट घेतल्या, तर



महिश तिक्षाना आणि अँजेलो मॅथ्यूज यांना प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. या सामन्यातील बांगलादेशच्या विजयाने उपांत्य फेरीची समीकरणे फारशी बदललेली नाहीत. पण अधिकृतपणे श्रीलंकेचा संघ आता या शर्यतीतून बाहेर पडला आहे. याशिवाय गुणतालिकेत आता बांगलादेश ४ गुणांसह सातव्या स्थानावर आला असून श्रीलंकेचेही ४ गुण झाले असले, तरी संघ आठव्या स्थानावर घसरला आहे. आता बांगलादेश आणि इंग्लंडसोबतच श्रीलंकेचेही नाव बाहेर पडणाऱ्या संघांमध्ये आले आहे. दुसरीकडे भारत आणि दक्षिण आफ्रिका उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. म्हणजेच आता ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि नेदरलँड हे संघ शेवटच्या दोन स्थानांसाठी लढताना दिसणार आहेत. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या 38 व्या सामन्यात बांगलादेश संघाने श्रीलंकेचा 3 विकेट राखून पराभव केला. एकूण स्पर्धेतील बांगलादेशचा हा दुसरा विजय ठरला असून श्रीलंकेचा सहावा पराभव आहे. दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर बांगलादेशने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेचा संघ 49.3 षटकांत सर्वबाद 279 धावांवर आटोपला. बांगलादेशने 280 धावांचे लक्ष्य 41.1 षटकात 7 गडी गमावून पूर्ण केले. नजमुल हसन शांतो (92) आणि शकीब अल हसन (80) बांगलादेशच्या विजयाचे हिरो ठरले. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने 72 धावांवर 3 गडी गमावले. यानंतर चरित असलंकाने शतक (108) केले. त्यांच्याशिवाय पथुम निसांका (41) आणि सदिरा समरविक्रमा (41) यांनी उपयुक्त योगदान देत संघाला आव्हानात्मक धावसंख्येपर्यंत नेले. प्रत्युत्तरात बांगलादेशने 41 धावांत 2 गडी गमावले. यानंतर शाकिब आणि शांतो यांनी उपयुक्त खेळी खेळली आणि बांगलादेशने 42 व्या षटकात सामना जिंकला. नाणेफेक गमावल्यानंतर फलंदाजीला आलेल्या श्रीलंकेच्या संघाला पहिल्याच षटकात कुसल परेराच्या (4) रूपाने मोठा धक्का बसला. तो शरीफुल इस्लामच्या चेंडूवर मुशफिकर रहीमने झेलबाद झाला. या खराब सुरुवातीतून मेंडीस आणि निसांकाने डाव सावरला आणि 10 षटकांनंतर 1 गडी गमावून 52 धावा केल्या.

### असलंकाचे शानदार शतक

असलंकाने चांगली फलंदाजी केली आणि त्याने एकदिवसीय कारकिर्दीतील दुसरे शतक 101 चेंडूत पूर्ण केले. विश्वचषकातील त्याचे हे पहिलेच शतक आहे. त्याने समरविक्रमासोबत 63 आणि धनंजय डी सिल्वासोबत 78 धावांची भागीदारी केली. त्याने 105 चेंडूत 108 धावांची शानदार खेळी केली, ज्यात 6 चौकार आणि 5 षटकारांचाही समावेश होता. दरम्यान, असलंकानेही त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीत 1,500 धावा पूर्ण केल्या. तस्किन अहमदने 10 षटकांत 3.9 षटकांच्या इकॉनॉमी रेटने 39 धावा दिल्या. किफायतशीर गोलंदाजी करूनही त्याला एकही विकेट घेता आली नाही. मेहदी हसन मिराजने 10 षटकात 49 धावा देत 1 यश मिळवले. कर्णधार शाकिबने 57 धावा देताना 2 बळी घेतले.

# अँजेलो मॅथ्यूज 'टाइम आऊट!

## 146 वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच घडले

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या 38 व्या सामन्यात असे काही घडले, जे पाहिल्यानंतर कोणाचाही विश्वास बसणार नाही. श्रीलंकेचा फलंदाज अँजेलो मॅथ्यूज फलंदाजीसाठी क्रिजवर आला, मात्र पंचांनी त्याला पॅव्हेलियनमध्ये परतण्यास सांगून बाद घोषित केले. या प्रकारानंतर मॅथ्यूज आणि पंचांमध्ये बराच वेळ वाद झाला, पण शेवटी लंकेच्या फलंदाजाला माघारी जावे लागले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फलंदाज टाईम आऊट होण्याची ही पहिलीच वेळ ठरली आहे.**

प्रथम फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेच्या संघाने 24.2 व्या षटकात चौथी विकेट गमावली. बांगलादेशचा



कर्णधार शकिब अल हसनने सदीरा समरविक्रमाला बाद केले. त्यानंतर अँजेलो मॅथ्यूज फलंदाजीला आला. क्रिजवर पोहचून तो बॅटींगसाठी स्टान्स घेणार तोच त्याच्या लक्षात आले की, आपल्या हेल्मेटचा बेल्ट खराब झाला आहे. हे पाहून त्याने हेल्मेट काढले आणि ड्रेसिंग रुमकडे पाहत राखीव खेळाडूकडे नव्या हेल्मेटची मागणी केली. त्यावेळी तो क्रिजच्या बीहेर बराच उशीरा थांबला. त्याचवेळी बांगलादेशचा कर्णधार शाकीब अल हसनने पंचांकडे अपील केले. दरम्यान, मॅथ्यूजला नवे हेल्मेट मिळाले. तो चेंडू खेळण्यासाठी सज्ज होणार तोच त्याला पंचांनी पॅव्हेलियनमध्ये जाण्यास सांगितले. हे पाहून मॅथ्यूजला आश्चर्य वाटले. जेव्हा त्याने पंचांना कारण विचारले तेव्हा त्याला कळले की त्याला क्रीजवर यायला खूप उशीर झाला होता आणि तो टाइमआउट झाला आहे. यानंतर मॅथ्यूज आणि पंचांमध्ये जोरदार वादावादी झाली. मॅथ्यूज विरोधी संघाचा कर्णधार शकिब अल हसनशीही बोलला, पण शाकिबही आपले अपील मागे घेण्यास तयार नव्हता. अशा स्थितीत मॅथ्यूजला एकही चेंडू न खेळता पॅव्हेलियनमध्ये जावे लागले. मॅथ्यूज रागाच्या भरात मैदानाबाहेर गेला. त्याने हेल्मेट आणि बॅट फेकून दिली. श्रीलंकेचे प्रशिक्षक ख्रिस सिल्व्हरवूडही या संपूर्ण घटनेने चांगलेच संतापलेले दिसले. श्रीलंकेचा कर्णधार कुसल मेंडिसने बांगलादेशचे प्रशिक्षक चंडिका हथुरुसिंघा यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी दोघांसोबत चौथे पंचही उपस्थित होते. पण फलंदाज बाद होऊन पॅव्हेलियनमध्ये परतल्याने हथुरुसिंहाच्या हातात काहीच नव्हते.

# नरेनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

वेस्ट इंडिजचा फिरकीपटू सुनिल नरेन याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. ३५ वर्षीय सुनिल नरेन याने आपल्या इन्स्टाग्राम पोस्टद्वारे याबाबतची माहिती दिली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी तो जगभरातील फ्रेंचायझीकडून क्रिकेट खेळत राहणार असल्याचे त्याने स्पष्ट केले आहे. त्यामुळे तो आगामी आयपीएलमध्येही खेळताना दिसेल. निवृत्तीची घोषणा करताना नरेन म्हणाला, “मी वेस्ट इंडिजकडून शेवटचा सामना खेळून चार वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. पण मी आज आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा करत आहे. मी सार्वजनिकरित्या खूप कमी बोलतो. परंतु काही लोकांनी माझ्या संपूर्ण कारकिर्दीत मला नेहमीच पाठिंबा दिला. वेस्ट इंडिजचे प्रतिनिधित्व करण्याचे माझे स्वप्न साकार करण्यास मदत केली. मी तुमचे मनापासून आभार व्यक्त करतो.” नरेन याने २०११ मध्ये वेस्ट इंडिजकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तो फक्त सहा कसोटी खेळला. नरेनने सहा कसोटीत २१ बळी घेतले. २०१२ मध्ये कसोटी पदार्पण केल्यानंतर त्याने २०१३ मध्ये या फॉरमॅटमध्ये शेवटचा सामना खेळला होता. त्याने २०१२ मध्ये वेस्ट इंडिजला टी-२० विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. शिवाय, नरेनने २०१२ च्या आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी केली होती. तो स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला होता.